# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

दू.क्र.: ०२२-६२५४२१००/११०/१८८

संकेतस्थळ : www.msbte.org.in ई-मेल : secretary@msbte.com

जा.क्र. मरातंशिमं/का-४०/लले/उ.प.२१/२०२१/ 068 दि. - 1 JUN 2021

**महत्वाचे परिपत्रक**

प्रति,

प्राचार्य,

मंडळाशी संलग्नीत सर्व संस्था.

**विषय :- उन्हाळी परीक्षा २०२१ च्या आयोजनाबाबत.**

संदर्भ :- १. मंडळाचे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चे वेळापत्रक क्र. MSBTE/D-40/Aademiccalender/B2/2020/0107, दि. ०८.१२.२०२०.

२.मंडळाचे महत्वाचे परिपत्रक क्र. मरातंशिमं/का-४०/लले/उ.प.२१/२०२१/०६७, दि. २७.०५.२०२१

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नीत सर्व संस्थांकरीता शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीताचे शैक्षणिक वेळापत्रक उपरोक्त संदर्भ क्र. ०१ च्या पत्राद्वारे जाहीर करण्यात आले होते. तसेच संदर्भ पत्र क्र. ०२ च्या परिपत्रकाद्वारे सम सत्रातील शैक्षणिक कालावधी, दुसरी घटक चाचणी व उन्हाळी परीक्षा २०२१ च्या कालावधीत करण्यात आलेल्या बदलाबाबत कळविण्यात आले होते. उन्हाळी परीक्षा २०२१ ची रुपरेषा व कार्यपध्दती याबाबत मंडळाच्या विद्वत समितीच्या दि. १२.०५.२०२१ रोजीच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात येऊन विद्वत समितीच्या शिफारशी व मान्यतेने उन्हाळी २०२१ परीक्षेबाबतच्या ठळक बाबी मंडळाशी संलग्नीत सर्व संस्था, विद्यार्थ्यांना व पालकांना माहिती व कार्यवाहीसाठी कळविण्यात येत आहे.

१. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त (अभियांत्रिकी व औषधनिर्माण) तसेच शासन मान्यताप्राप्त अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमातील (Non-AICTE) सर्व सत्र/वर्षातील विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक परीक्षा ऑनलाईन प्रणालीचा वापर करुन तोंडी पध्दतीने संस्थास्तरावर घेण्यात यावी. याकरिता विविध मिटींग ॲप्लिकेशनचा वापर करुन प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात यावी. शक्य नसल्यास टेलीफोनिक पध्दतीने सदर प्रात्यक्षिक परीक्षा संस्थास्तरावर घेण्यात यावी. वरील सर्व प्रयत्नांनंतरही विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक परीक्षा घेणे शक्य नसल्यास अशा विद्यार्थ्यांचे सत्रकर्म, जर्नल्स, निरंतर मुल्यमापन या अधारावर मुल्यमापन करुन गुण देण्यात यावेत.

२. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त (अभियांत्रिकी व औषधनिर्माण) अभ्यासक्रमातील सर्व सत्र/वर्षातील विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा Multiple Choice Question (MCQ) वापरुन ऑनलाईन पध्दतीने मंडळस्तरावरुन घेण्यात येईल. सदर परीक्षा विद्यार्थी Smart Mobile Phone/Laptop/Tablet/Desktop इत्यादीचा वापर करुन सद्यपरिस्थितीत ज्याठिकाणी वास्तव्यास आहेत त्या ठिकाणाहून देऊ शकतील. **सदर परीक्षेत विद्यार्थ्यांना ४० पैकी ३५ प्रश्न सोडविणे आवश्यक आहे. सदर परीक्षेकरिता विद्यार्थ्यांना ०२ तासाचा Slot देण्यात येईल. त्या Slot मध्ये विद्यार्थ्यांनी परीक्षेकरिता Login करुन प्रत्यक्ष परीक्षा Start केल्यानंतर ०१ तासाचा कालावधी देण्यात येईल. विद्यार्थ्याने Exam Start केल्यानंतर परीक्षेच्या कालावधीत कोणत्याही पध्दतीचा गैरमार्ग अवलंबणार नाही याची खातरजमा करण्याकरिता मंडळाने प्राधिकृत केलेल्या पर्यवेक्षकांमार्फत Online Proctoring (Monitoring) करण्यात येईल.**

ऑनलाईन लेखी परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक Online Proctoring (Monitoring) बाबतच्या सविस्तर सुचना व परीक्षेच्या कार्यप्रणालीबाबतच्या सविस्तर सुचना विद्यार्थी, संस्था व विभागीय कार्यालय यांना स्वतंत्रपणे परिपत्रकाद्वारे देण्यात येतील.

३. खालील तक्त्यात नमुद विषयांच्या अभ्यासक्रमात Drawing चा समावेश असल्याने या विषयांची परिक्षा MCQ वापरुन घेणे शक्य नाही. सदर विषयांची परीक्षा सत्रकर्म/अभ्यासक्रमावर आधारीत सादरीकरणाद्वारे ऑनलाईन पध्दतीने संस्थास्तरावर घेण्यात यावी. सदर सादरीकरण तसेच तोंडी प्रश्नोत्तरांच्या आधारे परिक्षक मुल्यांकन करतील.

| Sr. No. | Drawing paper code | Paper Name |
|---|---|---|
| 1 | 12634 | ARCHITECTURAL DESIGN –II |
| 2 | 17309 | BUILDING DRAWING |
| 3 | 17647 | CHEMICAL ENGINEERING DRAWING |
| 4 | 17923 | ENGINEERING DRAWING |
| 5 | 17940 | MECHANICAL ENGINEERING DRAWING |
| 6 | 17946 | BUILDING DRAWING |
| 7 | 19303 | PERSPECTIVE & SCIOGRAPHY |
| 8 | 19601 | ARCHITECTURAL DESIGN |
| 9 | 22207 | ENGINEERING DRAWING |
| 10 | 22341 | MECHANICAL WORKING DRAWING |
| 11 | 22405 | BUILDING PLANNING AND DRAWING |
| 12 | 22608 | CHEMICAL ENGINEERING DRAWING |

उपरोक्त नमुद केलेल्या Drawing विषयांची परीक्षा संस्थास्तरावर दि. २२ जुन ते ०३ जुलै २०२१ दरम्यान घेण्यात यावी.

४. शासन मान्यताप्राप्त अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमातील (Non-AICTE) सर्व सत्र/वर्षातील नियमित विद्यार्थी व बॅकलॉग विद्यार्थी यांची लेखी परीक्षा संस्था स्तरावर ऑनलाईन पध्दतीने Multiple Choice Question (MCQ) चा वापर करुन घेण्यात यावी. संस्थेने याबाबत वेळापत्रक तयार करुन विद्यार्थ्यांना त्याची माहिती द्यावी व मार्गदर्शन करावे. सदर संस्था स्तरावरील परीक्षेबाबत सविस्तर मार्गदर्शक सुचना संस्थांना स्वतंत्रपणे देण्यात येतील.

५. ज्या विद्यार्थ्यांकडे ऑनलाईन लेखी परीक्षेकरिता इंटरनेट, संगणक, मोबाईल इ. सुविधा उपलब्ध नाहीत अथवा उपलब्ध होऊ शकणार नाहीत अशा विद्यार्थ्यांकरिता शेवटचा पर्याय म्हणुन ऑनलाईन परीक्षा नजिकच्या तंत्रनिकेतनात घेण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल. याकरिता नियोजन करण्याची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थी प्रवेशित असलेल्या संबंधीत संस्थेची असेल.

६. जे विद्यार्थी अपवादात्मक परिस्थितीत संस्थेत येऊन परीक्षा देतील त्यावेळी संस्था व विद्यार्थ्यांनी कोव्हिड-१९ बाबतच्या केंद्र व राज्यशासनाच्या सर्व मार्गदर्शक सुचनांचे काटेकोर पालन करावे.

७. दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता नियमानुसार परीक्षेकरिता अधिकचा वेळ देण्यात येईल व संस्थांमार्फत अशा विद्यार्थ्यांना सोयीसुविधा पुरविण्यात याव्यात.

८. मंडळस्तरावर तसेच संस्था स्तरावर घेण्यात येणाऱ्या उन्हाळी परीक्षा २०२१ चे स्वरुप ऑनलाईन पध्दतीने असल्यामुळे, परीक्षा विषयक नियमावलीतील RG11K नुसार Photocopy/Verification and Reassessment ची सुविधा उन्हाळी परीक्षा २०२१ परीक्षेकरिता देण्यात येणार नाही.

९. परीक्षेबाबतचे ठळक वेळापत्रक खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| **A. AICTE Approved Engineering Diploma Courses and Pharmacy Courses.** | | |
|---|---|---|
| Sr. No. | Activity | Schedule |
| 01. | Conduction of practical / Oral Examination | 22 June – 03 July 2021 |
| 02. | Conduction of Theory Examination of all Regular & Backlog subject students at MSBTE level. | 13 July – 03 August 2021 |

| **B. State Government approved Short term Courses ( Non- AICTE)** | | |
|---|---|---|
| Sr. No. | Activity | Schedule |
| 01. | Conduction of Practical / Oral Examination for all Regular & Backlog subject students at institute level. | 22 June – 03 July 2021 |
| 02. | Conduction of Theory Examinations for Sem/year regular & Backlog Students at institute level. | 13 – 24 July 2021. |

१०. सर्व संस्थाप्रमुखांना सुचित करण्यात येते की, परीक्षेदरम्यान कोणताही गैरप्रकार होणार नाही याची दक्षता घ्यावी. परीक्षेदरम्यान गैरवर्तन झाल्यास मंडळाच्या परीक्षा विषयक नियमावलीतील RG12 मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल. याबाबत आपल्या संस्थेतील विद्यार्थी, अध्यापक व इतर कर्मचारी यांना अवगत करावे.

११. मंडळाच्या परीक्षा विषयक नियमावलीनुसार उन्हाळी २०२१ परीक्षेबाबतचे सर्व Records संस्थांनी त्यांचे स्तरावर जतन करुन ठेवावे.

१२. संस्थेच्या प्राचार्यांनी सर्व सत्र/वर्षातील विद्यार्थ्यांची उन्हाळी परीक्षा २०२१ करिता वरील सर्व बाबी विद्यार्थी व त्यांचे पालक यांना अवगत करुन द्याव्यात. तसेच विद्यार्थ्यांना परीक्षांबाबत मार्गदर्शन करावे. परीक्षा सुरळीतपणे व विहीत कालावधीत पार पडेल याची दक्षता घेवुन आवश्यक ती कार्यवाही करावी. परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्याची जबाबदारी सर्वस्वी संस्थेच्या प्राचार्यांची राहील याची नोंद घ्यावी.

(डॉ. महेंद्र रा. चितलांगे)
सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

**प्रत माहितीस्तव:-**

मा. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

**प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता:-**

१. प्राचार्य, सर्व स्वायत्त संस्था.
२. उपसचिव, मंडळाचे विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपुर , औरंगाबाद.